# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.06.2026** **वारःबुधवार**

1. केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला 12 वर्ष पूर्ण
2. मंत्रालयीन विभागांच्या पुनर्रचनेला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता
3. नीट यूजी पुनर्परिक्षेबाबत आवश्यक ती सर्व तयारी सुनिश्चित केल्याची केंद्रीय शिक्षणमंत्र्यांची ग्वाही
4. प्रत्येक जिल्ह्यात सीईटी सेलचं विद्यार्थी सहाय्यता केंद्र स्थापन करण्याची मंत्री चंद्रकांत पाटील यांची घोषणा आणि
5. विदर्भातील उन्हाळ्याच्या तीव्रतेच्या पार्श्वभूमीवर शाळा 22 जून रोजी सुरू होणार तर उर्वरीत राज्यात 15 जूनपासून शाळा सुरू होणार

**<u>तपपूर्ती</u>**

केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारची काल तपपूर्ती झाली. या सरकारला काल 12 वर्ष पूर्ण झाली. 2024 मध्ये कालच्याच दिवशी नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती. गेल्या 12 वर्षांत सुशासन, सर्वसमावेशक विकास, डिजिटल परिवर्तन, पायाभूत सुविधांचा विस्तार, राष्ट्रीय सुरक्षा आणि जनकल्याणकारी योजनांद्वारे भारताने विकासाची नवी उंची गाठली आहे. विकसित भारत 2047 च्या संकल्पनेच्या दिशेने देशाची वाटचाल अधिक वेगानं सुरू आहे. 'गेल्या बारा वर्षांत देशातल्या महिला, युवा आणि शेतकऱ्यांना सक्षम करण्यात कोणतीही कसर सोडली नाही', असं पंतप्रधानांनी आपल्या समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे म्हटलं आहे. दीडशे कोटी नागरिकांच्या सदिच्छांच्या बळावर सरकार लोकांचं कल्याण, विकास आणि त्यांचा विश्वास जिंकण्यासाठी समर्पित होऊन काम करत आहे, सरकारच्या अथक प्रयत्नांमुळे भारताला जागतिक पातळीवर एक नवी ओळख प्राप्त झाली आहे, असंही त्यांनी नमूद केलं आहे. गेल्या 12 वर्षांत पंतप्रधानांच्या दूरदर्शी नेतृत्वाने "सेवा हीच साधना" या भावनेतून सुशासनाची नवी व्याख्या घडवली आणि विकासाचा लाभ समाजातल्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवला, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

**<u>दशकपूर्ती</u>**

प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाला काल दहा वर्षं पूर्ण झाली. या महत्त्वपूर्ण टप्प्यानिमित्त आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयातर्फे सर्व राज्यांमध्ये '10 वर्षे-एक दशकाची काळजी' हा राष्ट्रीय कार्यक्रम कालपासून सुरू करण्यात आला. या योजनेअंतर्गत गर्भवती महिलांना मोफत आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध करून दिल्या जातात.

**<u>मंत्रीमंडळ निर्णय</u>**

प्रशासकीय कामकाजात गतिमानता आणि सुसूत्रता येण्यासाठी मंत्रालयीन विभागांच्या पुनर्रचना करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे सध्या अस्तित्वात असणाऱ्या 33 प्रशासकीय विभागांची संख्या आता 45 होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' आणि 'ईज ऑफ लिव्हिंग' संकल्पनेवर भर देण्याचं धोरण निश्चित केलं आहे. त्यानुसार मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना करण्यात आली. यामुळे निर्णय प्रक्रिया वेगवान होईल तसंच योजनांची अंमलबजावणी आणि क्षेत्रीय यंत्रणांशी प्रभावी समन्वय साधणं शक्य होणार आहे.

राज्यात नवीन महाविद्यालयांना, नवीन विद्याशाखांना, नवीन अभ्यासक्रमांना मान्यता देता यावी, यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम 2016 मध्ये सुधारणा करण्यालाही या बैठकीत मान्यता देण्यात आली. केंद्रीय वस्तू आणि सेवा कर अधिनियम 2017 मधल्या तरतुदींशी सुसंगत आणि सुसूत्र राहण्यासाठी महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियम 2017 तसंच

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर सुधारणा विधेयकात सुधारणा करण्यालाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली. औद्योगिक विकास महामंडळासाठी कर्ज उभारणीकरता अधिकारात वाढ करण्याला तसंच औद्योगिक विकास अधिनियमात सुधारणा करण्यालाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला पुरंदर विमानतळ जमीन संपादनासाठी हुडकोकडून 6 हजार कोटी रुपयांचं कर्ज घेण्यास शासनाने मान्यता आणि शासनहमी दिली आहे.

**प्रकाशन**

दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल इयत्ता पहिली ते सहावीच्या नवीन अभ्यासक्रमाच्या पाठ्यपुस्तकांचं प्रकाशन करण्यात आलं. मुंबईत मंत्रालयात झालेल्या या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री दादा भुसे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**बिरसा मुंडा**

'आदिवासी समाजाने शिक्षण, कौशल्य विकास, नवोपक्रम आणि आत्मनिर्भरतेच्या माध्यमातून प्रगती साधत राष्ट्रनिर्माणात प्रभावी भूमिका बजावावी', असं आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलं आहे. महाराष्ट्र लोकभवन इथं काल आयोजित भगवान बिरसा मुंडा यांच्या 126व्या बलिदान दिन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी तसेच वेगवेगळया भागातून आलेले आदिवासी बांधव, आदिवासी कलाकार उपस्थित होते. जननायक आणि क्रांतीचे महानायक बिरसा मुंडा यांच्या बलिदानातून आदिवासी समाजाला स्वाभिमान, संघर्ष आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा मिळत असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

**शाळा**

विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये उन्हाची तीव्रता अजूनही कमी झालेली नसल्याने या सर्व जिल्ह्यांमध्ये उन्हाळी सुट्ट्यांच्या नंतर शाळा उशिराने म्हणजे 22 जून रोजी सुरू होतील, असं राज्याच्या शिक्षण विभागानं कळवलं आहे. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळी सुट्ट्या संपवून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू करण्याबाबत शिक्षण संचालनालयानं काल एक महत्त्वाचं परिपत्रक जारी केलं. त्यानुसार विदर्भ वगळता उर्वरित राज्यातल्या शाळा येत्या 15 जून रोजी नियमित वेळेत सुरू होतील. विदर्भात 22 ते 30 जूनपर्यंत शाळा सकाळच्या सत्रात भारावल्या जातील, आणि 1 जुलैनंतर नियमित वेळेत भरतील.

**उपाययोजना**

केंद्र सरकारनं या महिन्याच्या 21 तारखेला होणाऱ्या नीट यूजी पुनर्परिक्षेच्या प्रश्नपत्रिकांच्या तयारीसह नंतरच्या सर्व प्रक्रियांपर्यंत संपूर्ण गोपनीयता बाळगत आवश्यक ते सर्व उपाय सुनिश्चित केले आहेत, असं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. प्रधान यांनी काल एनटीएच्या मुख्यालयाला भेट देऊन या परीक्षेच्या तयारीचा आढावा घेतला, त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. परीक्षेचं साहित्य परिक्षा केंद्रांपर्यंत व्यवस्थितपणे आणि वेळेवर पोहचण्याची दक्षता सरकार घेत असल्याचंही त्यांनी सांगितलं. यासंदर्भात राज्य सरकारांना याबाबत सूचना दिल्याचं प्रधान यांनी सांगितलं.

**सहाय्यता केंद्र**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी प्रत्येक जिल्ह्यात सीईटी सेलचं विद्यार्थी सहाय्यता केंद्र स्थापन करण्यात येणार असून सीईटी प्रवेश प्रक्रिया आणि शिष्यवृत्ती यासंदर्भात विद्यार्थ्यांना अचूक मार्गदर्शन आता जिल्हास्तरावरच मिळणार आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ही घोषणा केली आहे. काल मंत्रालयात यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. राज्यातल्या 36 जिल्ह्यांमध्ये 40 सीईटी विद्यार्थी सहाय्यता केंद्रं सुरू करण्यात येत असून मुंबईत तीन तर पुणे आणि नागपूर इथे प्रत्येकी दोन केंद्रं असतील. यापैकी 26 केंद्रांचं काम पूर्ण झालं असून सहा केंद्रं अंतिम टप्प्यात आहेत आणि उर्वरित आठ केंद्रंही लवकरच कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

**जामीन**

नीट यूजी पेपरफुटी प्रकरणी आरोपी मनीषा वाघमारेचा जामीन अर्ज दिल्लीच्या राऊज अवेन्यू न्यायालयानं फेटाळला आहे. याचप्रकरणी, 15 दिवसांच्या हंगामी जामिनासाठी यश यादवनं केलेल्या अर्जावर न्यायालयानं सीबीआयकडून उत्तर मागितलं आहे. येत्या 21 तारखेला होणारी नीटची फेरपरीक्षा देण्यासाठी, आणि बहिणीच्या लग्नासाठी यादवनं जामीन मागितला आहे.

**त्रिभाषा सूत्र**

नववीच्या विद्यार्थ्यांना तीन भाषा अनिवार्य करण्याच्या सीबीएसईच्या निर्णयाला माजी मंत्री फौजिया खान यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. तीन भाषा अनिवार्य करण्याचा सीबीएसईचा निर्णय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चं उल्लंघन असल्याचा आरोप खान यांनी केला आहे. 1 जुलैपासून इयत्ता नववीसाठी तीन भाषा अनिवार्य करणार असल्याचं परिपत्रक सीबीएसईने जारी केलं असून यातल्या दोन भाषा भारतीय असल्या पाहिजेत, असं म्हटलं आहे.

**हवामान**

दक्षिण कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**